
■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-२९९ ■ गुरूवार, दि. २० फेब्रुवारी २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये
■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -299 ■ Thursday, 20 Feb 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-



दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET
Email : attalsanket2023@gmail.com
RNI No. MAHMAR/2023/87816

**टाकळी माळी गावात लोकवर्गणीतून साकारला छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा**

टाकळी माळी गावात लोकवर्गणीतून साकारला छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. शिवरायांचे पूजन करतान ग्रामीण भागातील महिला.

## शिवसृष्टीसाठी राज्य सरकार देणार ५० कोटींचा निधी; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची घोषणा

**पुणे (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

'छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचा खजिना मोठा केला; पण तो स्वत:साठी वापरला नाही म्हणून ते श्रीमंतयोगी होते,' असा संदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समस्त राजकारण्यांना बुधवारी दिला. स्वदेश, स्वधर्म आणि स्वभाषा या महाराजांच्या त्रिसूत्रीवर उभा राहिलेली शिवसृष्टी पाहून मी नि:शब्द झालो आहे. हे राष्ट्रकार्य लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी राज्य सरकारतर्फे ५० कोटींचा निधी देण्यात येईल,' अशी घोषणा त्यांनी केली.

शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या संकल्पनेतून महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठानच्या वतीने आंबेगाव बुद्रुक येथील शिवसृष्टीच्या दुसऱ्या टप्प्याचे लोकार्पण देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शिवजयंतीदिनी झाले. खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले, केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सांस्कृतिक कार्यमंत्री अॅड.



आशिष शेलार, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे संघचालक नाना जाधव, पुणे महानगर संघचालक रवींद्र वंजारवाडकर, पुरंदरचे आमदार विजय शिवतारे, प्रतिष्ठानचे विश्वस्त जगदीश कदम, अमृत पुरंदरे, डॉ. विनय सहस्त्रबुद्धे उपस्थित होते. डॉ. अजित आपटे यांनी सूत्रसंचालन केले. विनीत कुबेर यांनी आभार मानले.

'अनेक देशांतील संग्रहालये पाहिली; पण येथील भाव वेगळा आहे. राज्य सरकारने शिवसृष्टीला पर्यटन स्थळाचा दर्जा दिला असला तरी ते अभ्यास आणि प्रेरणेचे केंद्र आहे. महाराजांचे हे जिवंत स्मारक आहे,' असे गौरवोद्गगार काढून फडणवीस म्हणाले, शिवरायांनी अरबी आणि फारसीम धील राज्यकारभार बंद करून मराठीला राज्यभाषेचा दर्जा दिला. पर्यायी मराठी शब्द लिहायला लावले. त्या प्रकारची नवीन आज्ञावली त्यांनी तयार केली.'

'लोकांपर्यंत इतिहास पोहचला नाही. इतिहास जाणणारी आणि देश प्रेम असलेली पिढी निर्माण होत नाही तोपर्यंत देशाचा विकास होत नाही. आपण वारसा विसरलो होतो. शिवाजी महाराजांनी आपल्याला गुलामगिरीतून बाहेर काढले,' याकडे त्यांनी लक्ष वेधले. दरम्यान, येथील गंगासागर तलावात राजगड, प्रतापगड, सिंहगड आणि घोडेस्वारांनी रायगडाहून आणलेले पाणी तसेच उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी प्रयागराज येथून पाठविलेल्या पाण्याचा कलश, तुळापूर त्रिवेणी संगमावरील पाणी आणि नर्मदा नदीचे पाणी यावेळी गंगासागरात अर्पण करण्यात आले. गंगासागर तलाव आणि प्रतापगडावरील भवानी मातेच्या मंदिराची प्रतिकृती पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती.

**दोन मावळ्यांची दांडी**

'मी आणि दोन्ही उपमुख्यमंत्री असे आम्ही तिघे मावळे आहोत. एकनाथ शिंदे हे छत्रपतींना मानणारे आहेत. अजितदादा पुण्याचे आहेत. शिवसृष्टीच्या निर्मितीसाठी महायुती सरकार काही कमी पडू देणार नाही,' अशी टिप्पणी देवेंद्र फडणवीस यांनी केली. मात्र, अन्य दोघा मावळ्यांचे नाव पत्रिकेत असतानाही त्यांनी दांडी का मारली, अशी चर्चा यावेळी रंगली होती.

शिवराय जगातील उत्तम योद्धे, रणनितीकार आणि प्रशासक होते. त्यांच्या काळात कायदा सुव्यवस्था चोख होती. म हिला सुरक्षित होत्या. जात किंवा स्थानाच्या आधारावरून न्यायनिवाडा होत नव्हता. किल्ल्यांची रचना, पाण्याचे व्यवस्थापन, बाजार व्यवस्था, अभेद्य संरक्षण व्यवस्था असे देशामधील सर्वोत्तम स्थापत्यशास्त्र शिवरायांच्या किल्ल्यांमध्ये पाहायला मिळते.- देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री

## गजानन महाराज प्रकट दिनाच्या शुभेच्छा

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

गजानन महाराज हे एक भारतीय हिंदू गुरु होते जे पहिल्यांदा महाराष्ट्रातील बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव या गावात तरुणपणी प्रकट झाले. ग्रेगोरियन कॅलेंडरनुसार, महाराजांचे



अवतार २३ फेब्रुवारी १८७८ रोजी समोर आला. गजानन महाराज हे एक भारतीय हिंदू गुरु होते जे महाराष्ट्रातील बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव या गावात तरुणपणी पहिल्यांदा प्रकट झाले. ग्रेगोरियन कॅलेंडरनुसार, महाराजांचे अवतार २३ फेब्रुवारी १८७८ होते. त्यांच्या पहिल्या प्रकटीकरणाची तारीख एक शुभ दिवस मानली जाते आणि तो प्रकत दिन म्हणून साजरा केला जातो.

या दिवशी श्री गजानन महाराजांच्या मंदिरातून पालख्या काढल्या जातात आणि त्यांच्या पादुकांची पूजा करण्यात येते. महाराष्ट्रात पाळल्या जाणाऱ्या पारंपारिक हिंदू चंद्र दिनदर्शिकेनुसार, श्री गजानन महाराज प्रकात दिन दरवर्षी माघ कृष्ण पक्ष सप्तमी तिथीला किंवा माघ महिन्यातील चंद्राच्या अस्ताच्या सातव्या दिवशी साजरा केला जातो. या दिवशी, दररोज हजारो लोक शेगावला पूजा करण्यासाठी आणि आशीर्वाद घेण्यासाठी येतात. पूजा, दान, सत्संग, प्रार्थना आणि अन्नदान हे या उत्सवाचा भाग आहेत. गजानन महाराजांच्या जीवनातील विविध पैलू 'श्री गजानन विजय ग्रंथ' नावाच्या पुस्तकात संकलित केले आहेत.

शेगावीचा राणा, ब्रह्मज्ञानी, भक्तवत्सल गजानन महाराज; म्हणा, गण गण गणात बोते! महाराजांच्या प्रकट दिनाच्या आपणास व आपल्या परिवारास हार्दिक शुभेच्छाः



टाकळी माळी येथे शिवजयंती साजरी करण्यात आली. यावेळी राजकुमार भाटी व मित्रमंडळ.

## टाकळी माळी गावात लोकवर्गणीतून साकारला छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा

आडुळ : प्रतिनिधी टाकळी माळी तालुका जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथे समस्त जनमानसाचे आराध्य दैवत हिंदवी स्वराज्य संस्थापक शौर्य वीर छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य असा अश्वारूढ पुतळा समस्त ग्रामस्थांच्या संकल्पनेतून साकारले शिवाजी महाराजांचे स्मारक आगळे वेगळे असणार आहे कारण तो सर्व शासकीय नियमानुसार उभारण्यात आलेला परिसरातील पहिलाच पुतळा ठरणार आहे. नियोजित अश्वारूढ पुतळ्याचे आगमन सोमवारी केंब्रिज चौक मार्गे करमाड पिंपरी राजा टाकळी माळी नगरीत भव्य मिरवणुकीद्वारे हा पुतळा आणण्यात आला. सकाळी छत्रपती संभाजी नगर येथून या पुतळ्याच्या भव्य शोभायात्रेला सुरुवात झाली. कॅब्रिज चौक शेंद्रा कुंबेफळ करमाड पिंपरी राजा या ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले. पारंपरिक पद्धतीत निघून ही शोभायात्रा छत्रपती शिवाजी महाराज नियोजित स्मारकापर्यंत आण्यात आली. या शोभायात्रेत शालेय विद्यार्थी, वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांसह शिव कालीन युद्ध कला पारंगत विद्यार्थ्यांनी शिवकालीन युद्ध प्रशिक्षण कला सादर करून उपस्थितांचे मन जिंकली. शिवभक्तांना अभिमान वाटावा असे हे स्मारक असेल. यासाठी खासदार संदिपान पाटील भुमरे, आमदार विलास बापू भुमरे, राज्यशासन प्रयत्नशील होते. राज्य शासन छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र आणि विचार सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचविण्याचे काम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करत आहे. या ऐतिहासिक क्षणाचे वारसदार होण्याची संधी या निमित्ताने मिळाली असून छत्रपती शिवाजी महाराजांचा पुढच्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे काम याम ाध्यमातून होणार असल्याने ग्रामस्थात आनंद होत आहे. या जागतिक दर्जाचे स्मारक व्हावे यासाठी सर्वांना सोबत घेऊन गावातील तरुणांनी नियोजन केल्याने सर्वत्र आनंद व्यक्त केला. छत्रपती शिवाजी महाराजांचा २१ (अंदाजे) फूट उंच पुतळा पिंपरी राजात दाखल झाला. पुतळा पाहण्यासाठी शिवप्रेम ींमध्ये प्रचंड उत्साह जाणवत होता. पुतळा दाखल होताच शिवप्रेमींनी त्याचे पूजन केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या परिसरातील इतर पुतळ्यांपेक्षा हा पुतळा उंच असल्याचे मानले जात आहे.

# मुख्य निवडणूक आयुक्तांपुढे पारदर्शी कारभाराचे आव्हान!

निवडणुकांमध्ये हार-जीत असते. अलीकडच्या काळात निवडणुकीत एखादा उमेदवार विजयी झाला की, त्यांचे समर्थक विजयी मिरवणुका काढतात; परंतु पदरी हार आली की, त्याचे खापर ईव्हीएमवर फोडण्याचे प्रकार महाराष्ट्रात नव्हे तर देशातील अनेक राज्यांत सुरू आहेत. समक्ष लोकशाही प्रणालीसाठी निवडणूक पद्धतीवर विश्वास असणे ही महत्त्वपूर्ण बाब असली तरी, मतदारांच्या विश्वासाला तडा देण्याचे काम काही राजकीय मंडळी आजही पद्धतशीररीत्या करत आहेत. त्यामुळे जनतेच्या मनात निवडणूक प्रक्रिया ही नि:पक्षपातीपणाने होते आहे, हे दाखवून देण्याची जबाबदारी ही केंद्रीय निवडणूक आयोगाची आहे.

आता केंद्रीय निवडणूक आयोगाला ज्ञानेश कुमार यांच्या रूपाने नवे आयुक्त मिळाले आहेत. केंद्रीय निवडणूक आयोगातील त्यांच्या कार्यकाळाला एक वर्षांचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वीच मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून त्यांना बढती मिळाली आहे, ही त्यांच्या दृष्टीने अभिमानाची बाब आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील समितीच्या बैठकीत मावळते मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्या जागी ज्ञानेश कुमार काम पाहतील, असा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. देशाचे २६ वे निवडणूक आयुक्त म्हणून ज्ञानेश कुमार यांची कारकीर्द सुरू होत आहे. ज्ञानेश कुमार हे १९८८ च्या केरळ केडरचे आयएएस अधिकारी आहेत. ते मूळचे उत्तर प्रदेशचे असून, १४ मार्च २०२४ ला लोकसभा निवडणुकीपूर्वी भारतीय निवडणूक आयोगात निवडणूक आयुक्त म्हणून घेण्यात आले होते. ज्ञानेश कुमार यांनी १४ मार्चला पदभार स्वीकारल्यानंतर दुसऱ्याच दिवशी म्हणजे १५ मार्चला लोकसभा निवडणुका जाहीर झाल्या होत्या. ज्ञानेश कुमार यांच्या मुख्य निवडणूक आयुक्तपदाच्या निवडीला काँग्रेसने विरोध केला होता. निवड समितीमध्ये बदल करणाऱ्या केंद्राच्या कायद्याला आव्हान देणाऱ्या याचिकेबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या १९ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या सुनावणीपर्यंत नियुक्ती करू नये अशी मागणी केली होती. तरीही नवीन मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या नियुक्तीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. ते २६ जानेवारी २०२९ पर्यंत पदावर कार्यरत राहणार आहेत. त्यांच्या कार्यकाळात या वर्षाच्या अखेरीस होणाऱ्या बिहार विधानसभा निवडणुका तसेच २०२६ मध्ये होणाऱ्या केरळ, तामिळनाडू, पश्चिम बंगाल आणि पुद्दुचेरी विधानसभा निवडणुका होत आहेत. या आधीची ज्ञानेश कुमार यांची प्रशासकीय कामगिरी चांगली आहे. २०१८ ते २०२१ मध्ये ज्ञानेश कुमार यांनी ३७० कलम हटवण्यामध्ये आणि जम्मू-काश्मीर राज्याच्या पुनर्रचनेत महत्त्वाचे योगदान दिले आहे. नरेंद्र मोदी यांचे विश्वासू म्हणून ते ओळखले जातात. राम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टच्या निर्मितीत देखील त्यांनी महत्त्वाचे काम केले आहे. याशिवाय ज्ञानेश कुमार यांनी मल्टी स्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी कायदा २०२३ निर्मितीमध्ये महत्त्वाची भूमिका होती. सहकार क्षेत्रातील पारदर्शकता वाढवण्यासाठी हे योगदान देण्यात आले होते. त्यामुळे आता निवडणूक आयोगाची विश्वासार्हता वाढविण्याची महत्त्वाची जबाबदारी त्यांच्यावर आली आहे. २०१९ नंतर देशभरात झालेल्या लोकसभा, विधानसभा निवडणुकांमध्ये ईव्हीएम मशीनवर अनेक मतदारसंघांत संशय व्यक्त करण्यात आला. या संदर्भात उच्च न्यायालयापासून सर्वोच्च न्यायालयात अनेक याचिका प्रलंबित आहेत. त्यामुळे निवडणूक आयोगांवर व्यक्त करण्यात आलेल्या आक्षेपांवर चोख उत्तर देण्याची जबाबदारी ही निवडणूक आयोगाची आहे. केंद्रीय निवडणूक आयोगातील अधिकाऱ्यांकडून सत्ताधारी पक्षाला झुकते माप दिले जाते असा आरोप आजचा नाही, तर तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी असतानापासूनचा आहे. मात्र, टी. एन. शेषन हे केंद्रीय निवडणूक आयुक्त असताना त्यांनी ज्या पद्धतीने काम करून, निवडणूक आयोगाची प्रतिमा उंचावली होती, तीच प्रतिमा आजही भारतीय जनमानसावर गारूड करून राहिली आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी दरम्यानही न्यायाधीशांनी टी. एन. शेषन यांच्यासारखे काम करा, असा सल्ला निवडणूक आयोगाला दिला होता. त्यात देशात 'एक देश, एक निवडणूक' ही प्रक्रिया २०२९ साली राबविण्याचे मोठे आव्हान केंद्रीय निवडणूक आयोगासमोर असेल. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली समितीने केंद्रीय मंत्रिमंडळाला सादर केलेल्या अहवालानंतर केंद्रीय मंत्रिमंडळाने या विधेयकाला मंजुरी दिली आहे.

लोकसभेत एक देश, एक निवडणूक विधेयक सादर करण्यात आले होते; परंतु विरोधकांनी केलेल्या तीव्र विरोधानंतर मतदान घेण्यात आले होते. या विधेयकाला समर्थनार्थ २६९ तर विरोधात १९८ मतदान झाले होते; परंतु संसदेत विधेयक मंजूर होण्यासाठी पुरेसे संख्याबळ नसल्याने, सदर विधेयक राज्यसभेत न पाठवता, जेपीसीकडे चिकित्सेसाठी गेले आहे. आज ना उद्या सदर विधेयक संसदेत मंजूर होईल; परंतु देशाची भौगोलिक स्थिती पाहता, एकाचवेळी विधानसभा आणि लोकसभेच्या निवडणुका घेऊन ते शिवधनुष्य उचलण्याचे काम केंद्रीय निवडणूक आयोगाला करावे लागणार आहे. निवडणुका दर पाच वर्षांनी होतात. एका मतदारसंघात एकच व्यक्ती निवडून येतो, ही वस्तुस्थिती असली तरी, ज्या मतदारांनी मतदान करून आपल्या मनातील उमेदवारांला निवडून आणण्यासाठी मतदान केंद्रापर्यंत जाण्याचे कष्ट घेतले आहे, तो मतदारांचा विश्वास कायम टिकवून ठेवण्याचे काम नव्या निवडणूक आयुक्तांना करावे लागणार आहे. ही सुद्धा एकप्रकारे निवडणूक आयोगाची मोठी कसोटी ठरणार आहे.

# जिजाऊ-शहाजी राजांचे सुपुत्र: छ.शिवाजी राजे!

**(शिवजयंती उत्सव सप्ताह विशेष)**

महाराष्ट्रच नव्हे तर अख्ख्या भारताचे लाडके छत्रपती शिवाजी महाराज हे शिवाजीराजा, शिवाजीराजे, शिवबा, शिवबाराजे, शिवराय अशा अनेक नावांनी ओळखले जातात. शिवरायांचा जन्मदिवस हा शिवजयंती म्हणून साजरा होतो. शिवाजीरिजे आणि त्यांचे पुत्र छत्रपती संभाजीराजे यांचा संयुक्त नामोल्लेख शिवशंभू असा होतो. सर्वसाधारणपणे इतिहासकार शिवाजी महाराजांचा जन्म- १६३० ते औरंगजेबाचा मृत्यू- १७०७ या ७७ वर्षांच्या काळास शिवकाल असे म्हणतात. शिव छत्रपतींबद्दल पुरेपूर माहिती लिहिण्याची आपली काय औकात? असे म्हणत श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी- अलककार यांनी शब्दबद्ध केलेले काही प्रसंगच वाचकांच्या सेवेत... संपादक

शिवाजी महाराजांच्या जयंतीला महाराष्ट्रात 'शिवजयंती' म्हणतात. ती राज्यभर एखाद्या मोठ्या सणाप्रमाणे साजरी केली जाते. त्यांच्या जन्म दिनांकाबद्दल वाद असल्याने शिवजयंती महाराष्ट्रात वर्षभरात किमान दोनदा तरी साजरी होते. त्या दिवशी दिवसभर ढोल-ताशे वाजवीत मिरवणुका निघतात आणि शिवाजीच्या पुतळ्यांना हार घालण्याचा कार्यक्रम होतो. अनेक ठिकाणी शिवाजी महाराजांच्या जन्माच्या वेळी जी कालगणना प्रचलित होती त्यानुसार शिवाजी जयंती तिथीनुसार साजरी केली जाते. सन २००१ सालापासून १९ फेब्रुवारी या तारखेला सरकारी शिवजयंती साजरी होते. छत्रपती शिवाजीराजे भोसले, जे शिवराय म्हणूनही जगविख्यात आहेत. महाराष्ट्राच्या इतिहासाचे कोणतेही पुस्तक पाहिले तर मुखपृष्ठ हे छत्रपती शिवाजी महाराजांचेच दिसेल. कारण ते येथील मराठा साम्राज्याचे संस्थापक होते. भोसले कुळातील या राजाने विजापूरच्या आदिलशाही आणि मोगल साम्राज्य यांच्याविरुद्ध संघर्ष करून मराठा स्वराज्य स्थापन केले. रायगड ही राजधानी असलेले स्वतंत्र मराठा राज्य महाराजांनी उभे केले आणि इ.स.१६७४मध्ये छत्रपती म्हणून राज्याभिषेक करवून घेतला. शिस्तबद्ध लष्कर व सुसंघटित प्रशासकीय यंत्रणेच्या बळावर छत्रपती शिवाजी महाराजांनी एक सामर्थ्यशाली आणि प्रागतिक राज्य उभे केले. भूगोल-इतिहासाचे ज्ञाते, आश्चर्यजनक वेगवान हालचाली आणि बलाढ्य शत्रूंचे मनोधैर्य खच्चीकरणात नेमके हल्ले, यांचा वापर करणारे गनिमी काव्याचे तंत्र त्यांनी यशस्वीपणे हाताळले होते. आपल्या वडिलांकडून मिळालेल्या दोन हजार सैनिकांच्या छोट्या तुकडीपासून एक लाख सैनिकांचे लष्कर त्यांनी उभे केले. किनारे आणि अंतर्गत प्रदेशातील किल्ल्यांची डागडुजी करण्यासोबतच अनेक किल्लेही त्यांनी उभारले. राज्यकारभारात मराठी भाषेचा वापर करण्यास त्यांनी प्रोत्साहन दिले होते.

पुणे जिल्ह्यातील जुन्नर शहरानजीक वसलेल्या शिवनेरी या डोंगरी किल्ल्यावर दि.१९ फेब्रुवारी १६३० रोजी छ.शिवाजी महाराजांचा जन्म झाला. इतिहासाच्या अभ्यासांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची नेमकी जन्मतारीख हा एकेकाळी मतभेदांचा मुद्दा होता. तो वाद नंतर मिटला. महाराष्ट्र राज्य शासनाने फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१ अर्थात शुक्रवार दि.१९ फेब्रुवारी १६३० ही शिवरायांची जन्मतारीख २००१ साली स्वीकारली. इतर संभाव्य तारखांमध्ये ६ एप्रिल १६२७- वैशाख शुद्ध तृतीया ही एक जन्मतारीख मानली जात होती. एका आख्यायिकेनुसार शिवनेरी गडावरील शिवाई देवीला माता जिजाईनी आपल्याला बलवान पुत्र व्हावा, अशी प्रार्थना केली होती. म्हणून या मुलाचे नाव शिवाजी ठेवले गेले. त्यांच्या जन्माच्या वेळी दख्खनमधील राजसत्ता विजापूर, अहमदनगर आणि गोवळकोंडा



या तीन मुसलमानी सल्तनतींमध्ये विभागलेली होती. शहाजीराजांनी आपली निष्ठा वेळोवेळी अहमदनगरची निजामशाही, विजापूरची आदिलशाही आणि मुघल यांच्यादरम्यान बदलली; पण त्यांनी पुणे ही नेहमीच आपली जहागिरी ठेवली आणि स्वतःची एक लहानशी फौज पदरी बाळगली होती. आई जिजाई छोट्या शिवबासह पुण्यात रहायला गेल्या. त्यावेळी पुण्याची फार दुरवस्था झालेली होती. तेव्हा छोटे शिवराय व कारभारी यांच्या हस्ते पुण्यात एका शेतात प्रतीकादाखल सोन्याच्या मुलाम्याचा नांगर फिरवून पुण्याची पुन:स्थापना करायला सुरुवात केली. शिवाजीराजे लहानाचे मोठे होत असताना आणि त्यानंतरही प्रत्येक महत्त्वाच्या प्रसंगी त्यांना जिजामातेनी खंबीर मार्गदर्शन केले. शिवाजी महाराजांच्या त्या आद्यगुरू होत. हिंदवी स्वराज्य स्थापनेचे स्वप्न साकार करायला त्यांना जिजाऊंनी स्फूर्ती दिली, असे काही इतिहासकार सांगतात. युद्धाभ्यास आणि रणनीती तसेच राजकारभार यासंबंधी प्राथमिक मार्गदर्शन त्यांना शहाजी राजांकडून दप्तर व न्यायव्यवस्थेचे शिक्षण, परकीय सत्तेविरूद्ध लढा देण्यात आवश्यक असलेल्या शिस्तीचे शिक्षण माता जिजाऊकडून मिळाले, असे उपलब्ध ऐतिहासिक माहितीवरून निश्चितपणे सांगता येते. जिजाऊंनी शिवबांच्या शिक्षणाची जबाबदारी घेऊन त्यांस युद्धकला व राजनीतिशास्त्राचे शिक्षण देवविले. शिवाय संत एकनाथ महाराजांच्या भावार्थ रामायण, भारूड आदींच्या माध्यमातून त्यांच्या मनात स्वराज्याचे स्फुल्लिंग चेतविले.

शिवरायांची राजमुद्रा: छत्रपती शिवाजीराजे जेव्हा पुण्याचा कारभार पाहू लागले, तेव्हा त्यांनी स्वतःची स्वतंत्र राजमुद्रा तयार केली. ही राजमुद्रा संस्कृत भाषेत होती. ती अशी- 'प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता शाहसुनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते!' त्याचा मराठी अर्थ- 'ज्याप्रमाणे प्रतिपदेचा चंद्र वाढत जातो आणि साऱ्या विश्वात वंदनीय होतो. तशीच शहाजींचा पुत्र शिवाजींची ही मुद्रा व तिचा लौकिक वाढत जाईल!'

पन्हाळगडापासून काही अंतरावर वाटेत सिद्दीच्या सैन्याने त्यांना घोडखिंडीत गाठले आणि हातघाईची लढाई सुरू झाली. तेव्हा शिवाजीराजांचे विश्वासू पराक्रमी सरदार बाजीप्रभु देशपांडे यांनी शिवाजीराजांना विनंती केली, की त्यांनी विशालगडासाठी पुढे कूच करावी. खिंडीतील लढाई ते स्वतः लढतील. विशालगडावर पोहोचताच तोफांच्या तीन डागण्या ऐकू आल्या म्हणजे शिवाजीराजे सुखरूप गडावर पोहचले, असा संदेश मिळेल. बाजीप्रभु देशपांडे- यांनी वचन दिले, की जोपर्यंत तोफांचे तीन आवाज ऐकू येणार नाहीत, तोपर्यंत सिद्दी जौहरला खिंडीमध्येच झुंजवत ठेवतील. महाराजांना ते पटेना, पण बाजीप्रभूच्या विनंतीवजा हट्टापुढे त्यांनी यास मान्यता दिली आणि विशालगडासाठी कूच केली. बाजींनी सिद्दीच्या सैन्याला रोखून धरण्यासाठी प्रयत्नांची शर्थ केली, परंतु संख्येने कितीतरी पटीने अधिक सैन्यापुढे त्यांनी प्राणांची बाजी लावली. ते स्वतः प्राणांतिक रितीने घायाळ झाले होते.

शेवटी सैनिकांनी मृत्युपथावर असलेल्या घायाळ बाजींना एके ठिकाणी आणून बसविले, मात्र बाजीप्रभूंचे प्राण कानाशी साठले होते. थोड्या वेळाने तोफांचे तीन आवाज ऐकू आले आणि शिवाजीराजे गडावर पोहोचल्याचा तो संदेश समजल्यावरच बाजीप्रभूंनी प्राण सोडले. शिवाजीराजांना ही बातमी फार चटका लावून गेली. बाजीप्रभू हे ज्या घोडखिंडीत लढले आणि स्वतःच्या प्राणांचे बलिदान दिले त्या घोडखिंडीचे नाव त्यांनी पावनखिंड असे बदलले. बाजीप्रभूंच्या बलिदानाने पावन झालेली ती पावनखिंड होती.

मोगल साम्राज्याचा नर्मदा नदीपलीकडे विस्तार करणे, तसेच शिवाजी महाराजांच्या राज्यविस्ताराला वेसण घालणे या दोन हेतूंसाठी औरंगजेबाने त्याचा मामा शाहिस्तेखान याला दख्खनच्या मोहिमेवर पाठविले. प्रचंड मोठा लवाजमा, सैन्य आणि फौजफाटा सोबत घेऊन शाहिस्तेखान निघाला आणि वाटेत असणाऱ्या प्रत्येक राज्यात, गावात त्याने दहशत पसरवीत जमेल तेवढा जमेल तेथे विध्वंस केला.

शेवटी पुण्याजवळील चाकणचा किल्ला जिंकून पुण्यातील शिवरायांच्या लाल महालातच तळ ठोकला. महाराजांनी खानाचा बंदोबस्त करण्यासाठी एक धाडसी निर्णय घेतला. तो म्हणजे लाल महालात शिरून खानाला संपविण्याचा! लाल महालात आणि अवतीभोवती खडा पहारा आणि महालात शिरणे अतिशय जोखमीचे काम होते. एके रात्री जवळूनच जाणाऱ्या एका लग्नाच्या मिरवणुकीचा आधार घेऊन काही मोजक्या माणसांसह स्वतः शिवाजी महाराज लाल महालात शिरले. महालाचा कानाकोपरा माहीत असल्यामुळे लवकरच प्रत्यक्ष शाहिस्तेखानच्या खोलीत त्यांनी प्रवेश केला. तोपर्यंत महालात कोठेतरी झटापट सुरू झाल्यामुळे शाहिस्तेखानला जाग आली. तेवढ्यातच त्यांना समोर पाहून खानाने जीव वाचविण्यासाठी सरळ खिडकीतून खाली उडी घेतली.

महाराजांनी चपळाईने केलेला वार हुकल्यामुळे खानाच्या प्राणावर बेतण्याऐवजी त्याची हाताची तीन बोटे कापली गेली. अनेकदा या गोष्टीचा अप्रत्यक्ष फायदा शिवराय किंवा त्यांच्या सैन्याला मिळाला. शत्रू सैन्यामध्ये ते घुसल्याच्या केवळ अफवा पसरवून संख्येने किरकोळ असलेल्या मावळ्यांनी संख्येने अनेक पटींनी मोठ्या सैन्याची उडविलेली दाणादाण ही याच गोष्टीची साक्ष देऊ शकते. इ.स.१६६३ सालचे शाहिस्तेखान प्रकरण शिवाजीराजांच्या जीवनात आणखी एका नाट्यमय प्रसंगाची भर घालून गेले. शिवछत्रपतींच्या अशा अनेकानेक पराक्रमी व विजयी घोडदौडी झाल्या. त्यानंतर प्रदीर्घ आजारपणामुळे छ.शिवाजी महाराजांचा मृत्यू दि.३ एप्रिल १६८० रोजी रायगड येथे झाला, असे सांगितले जाते. !! शिवजयंती निमित्ताने शिव छत्रपतींना मानाचा मुजरा व सर्वांना प्रेरणादायी शिवमय हार्दिक शुभेच्छा!!



- संकलन व शब्दांकन -
**श्री एन. के. कुमार**
जी. से.नि.अध्यापक.
गडचिरोली मोबा-
७७७५०४१०८६.

# शिवचरित्रातील एक अद्भुत प्रसंग.. उंबरखिंडची अभूतपूर्व रणनिती!

रात्रीचा गडद अंधार, दाट जंगल, आणि त्या शांततेत दबा धरून बसलेले मावळे.. शत्रूला कल्पनाही नव्हती की पुढे काय घडणार आहे!

१६६१ साल, औरंगजेबाने आपल्या सेनापती कर्तलब खानला २०,००० मुघल सैन्यासह रायगड जिंकण्याच्या मोहिमेवर पाठवले होते. पण छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ तलवारीचे नव्हे तर रणनितीचेही बादशाह होते. त्यांना ठाऊक होतं की, शत्रू बलाढ्य असला तरी रणभूमी आपण ठरवली तर विजय आपलाच असेल..

महाराजांनी उंबरखिंडची अरुंद घळी रणभूमी म्हणून निवडली. मावळ्यांनी डोंगरकड्यांवर, झाडांआड जागा घेतली. एकदा का मुघल सैन्य खिंडीत आलं की, त्यांच्या सुटकेचा मार्गच शिल्लक राहणार नव्हता.. आणि तसंच झालं.. शत्रू खिंडीत शिरताच महाराजांच्या इशाऱ्यावर मराठ्यांनी चारही बाजूंनी अचानक हल्ला चढवला. वरून भाले, बाण, दगडांचा मुसळधार वर्षाव झाला. मुघल सैनिक गोंधळून गेले, पळून जाण्याचा मार्ग नव्हता, प्रतिकार करावा तर समोर अदृश्य मराठ्यांचा वेढा होता..

मराठ्यांच्या आक्रमणापुढे मुघल सैन्य फार काळ टिकू शकलं नाही. कर्तलब खानने स्वतःचा पराभव कबूल केला, हजारो सैनिकांनी आत्मसमर्पण केलं, आणि उरलेले जीव वाचवण्यासाठी मागे पळाले.. पण महाराजांनी मुघलांना ठार केलं नाही. त्यांना सुखरूप परत पाठवून एक स्पष्ट संदेश दिला. 'स्वराज्यावर हल्ला कराल, तर असाच पराभव होईल!' कर्तलब खान महाराजांच्या शौर्याने आणि उदारतेने प्रभावित झाला. त्यानं आदबीनं महाराजांना मुजरा केला!

'जिथे मार्ग नसतो, तिथे मार्ग निर्माण करावा लागतो' हे तत्त्व छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रात प्रकर्षाने आढळते. यवनांच्या आक्रमणाने उद्ध्वस्त झालेल्या पुण्याच्या भूमीतून महाराजांनी स्वराज्याची उभारणी केली. कोणतीही राजकीय मदत नव्हती, ना नव्या राज्याच्या निर्मितीसाठी धनदौलत होती. फक्त आईसाहेब जिजाऊंच्या संस्कारांवर निस्सीम श्रद्धा ठेवत त्यांनी हिंदवी स्वराज्याचे स्वप्न साकार केले. त्यांच्या अद्वितीय पुरुषार्थातून जन्मलेले हे स्वराज्य म्हणजे पराक्रम, कणखर नेतृत्व आणि अपार धैर्याचीच गाथा आहेः

**-अतुल चव्हाण**
मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे.

# माझं नेहमीच एक स्वप्न होतं की येथे यावं आणि शिवरायांचं दर्शन घेण्याची संधी मिळावी विकी कौशल





**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

१९ फेब्रुवारीला छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती संपूर्ण देशभरात मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. शिवप्रेमी यानिमित्ताने विविध ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन करतात. ढोल-ताशाच्या गजरात मिरवणुका काढल्या जातात, महाराजांच्या गड-किल्ल्यांचं संवर्धन व्हावं यासाठी तरुणपिढीला मार्गदर्शन केलं जातं. अशाप्रकारे हा शिवजयंती उत्सव विविध भागात साजरा केला जातो. याशिवाय स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगडावर सुद्धा विविध कार्यक्रमांचं आयोजन केलं जातं. याठिकाणी शिवप्रेमींसह बरेच मान्यवर शिवजयंतीला उपस्थित असतात. शिवजयंतीनिमीत्त कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, पर्यटन मंत्री शंभूराजे देसाई, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार उपस्थित राहाणार आहेत.

रायगडावर पोहोचल्यावर विकी कौशलची पहिली प्रतिक्रिया; म्हणाला, 'माझं नेहमीच एक स्वप्न होतं की..' छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज छावा चित्रपटात संभाजी महाराजांची भूमिका साकरणारा बॉलिवूड अभिनेता विकी कौशल यांने रायगडावर छत्रपती शिवरायांचे दर्शन घेतले.

यावेळी रायगडावर माध्यमांशी बोलताना विकी म्हणाला की, मी स्वत:ला खूपच भाग्यशाली समजतो की मला येथे येण्याची संधी मिळाली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या सर्वांना शुभेच्छा.

माझं नेहमीच एक स्वप्न होतं की येथे यावं आणि शिवरायांचं दर्शन घेण्याची संधी मिळावी आणि आज आशीर्वाद घेतल्यानंतर खूप चांगलं वाटत आहेङ्क.

मी छत्रपती संभाजी महाराज यांची भूमिका साकारावी हे माझं भाग्य आहे. लोकांचं प्रेम पाहून खूप चांगलं वाटत आहे. आज जे आहे ते सगळं छत्रपती शिवाजी महाराज यांच्यामुळे आहे. त्यांच्या जयंतीच्या सर्वांना शुभेच्छा, असेही विकी कौशल यावेळी बोलताना म्हणाला.

संभाजी महाराज यांची जीवन साकारताना छत्रपती शिवाजी महाराज यांची भूमिका काय होती? या प्रश्नाला उत्तर देताना विकी म्हणाला की, ङ्गमाझ्या मते फक्त छत्रपती संभाजी महाराज यांचे जीवन साकारण्यात नाही तर देशभरातली प्रत्येक तरुणाचं जीवन साकारण्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची भूमिका आपण लक्षात ठेवली पाहिजे. कारण त्यावेळी देशातील पहिले रयतेचे राजा होते. ते रयतेसाठी लढले आणि त्यांच्यासाठीच जगले. आजही आपल्याला त्यांच्याकडून प्रेरणा मिळते. आजही आपण जे सरकार पाहातो त्या सगळ्याची सुरूवात इथून होते.

## ओबीसी, दलित, मराठांनी आपल्या देव्हाऱ्यात छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महात्मा फुले यांना स्थान दिले पाहिजे.- वैशाली तभाने!




नागपूर दि.१९/ देव्हाऱ्यातल्या देवांनी या देशातील कोट्यवधी ओबीसी, दलित, मराठा, आदिवासी यांना काय दिले होते फक्त अंध भक्ती, अंधश्रद्धा, पारंपरिक मंत्र परंतु जेव्हा या देशात छत्रपती शिवाजी, महात्मा फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर सावित्रीबाई फुले यांच्या जन्म झाला कोट्यवधी लोकांचे भाग्य उजळले यांच्या मुळे सती प्रथा, अंधश्रद्धा, निर्मूलन विज्ञानाच्या युग आणि शैक्षणिक चळवळीला चालना मिळाली मग खरे कोण याच साठी ओबीसी,मराठा, दलित, आदिवासी यांनी आपल्या देव्हाऱ्यात देवाला नाही तर या महापुरुषांचे फोटो लावावे असे प्रतिपादन आंबेडकरी महिला मोर्चा अध्यक्षा वैशाली तभाने यांनी केले ते आंरिमोचा कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना बोलत होते.

या प्रसंगी आंरिमो चे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या छायाचित्रावर पुष्पहार अर्पण केले सुनिता चांदेकर यांनी दिपप्रज्वलन केले जेष्ठ नेते नामदेवराव निकोसे यांनी शिवाजी महाराज यांच्या जिवन चरित्र पटवून सांगितले ओबीसी नेते राजु पांजरे , मामासाहेब मेश्राम, अतुल गंगापूरकर, मनोहर इंगोले, अभिषेक मिश्रा, राहूल त्रिवेदी, उपस्थित होते.

## दिल्ली येथील साहित्य संमेलनात डॉ. सुरेश हिवाळे यांचा सहभाग



सेलू : येथील नूतन विद्यालयातील सहशिक्षक कवी डॉ. सुरेश हिवाळे यांचा ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील कवी कट्ट्यात सहभाग आहे. सरहद पुणे आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन तालकटोरा स्टेडियम, नवी दिल्ली येथे २१, २२, २३ फेब्रुवारी रोजी होते आहे. या मराठी साहित्य संमेलनातील कवी कट्ट्यात डॉ. सुरेश हिवाळे यांच्या 'भारतीय' कवितेची निवड झाली असून सदर कविता ते रविवार ( दि. २३ ) रोजी संमेलनातील महात्मा ज्योतिराव फुले सभामंडपात सादर करणार आहेत. ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील सहभागा बद्दल डॉ. सुरेश हिवाळे यांचे नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. एस एम. लोया, उपाध्यक्ष डी. के. देशपांडे, सचिव प्राचार्य डॉ. विनायकराव कोठेकर, सहसचिव जयप्रकाश बिहाणी, कार्यकारिणी सदस्य प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी , मुख्याध्यापक संतोष पाटील, उपमुख्याध्यापक किरण देशपांडे, पर्यवेक्षक रोहीदास मोगल, मुख्याध्यापक सर्जेराव लहाने, डॉ. अशोक पाठक, डॉ. शरद ठाकर, किशोर कटारे, डॉ. काशिनाथ पल्लेवाड, रामराव गायकवाड, रामराव बोबडे, माधव गव्हाणे यांनी अभिनंदन केले आहे.

## श्रीराम वाचनालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

हिंदवी स्वराज्य संस्थापक आणि महाराष्ट्रचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती जालना येथील ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालय येथे (दि.१९) रोजी साजरी करण्यात आली.

प्रारंभी ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालयाचे सचिव श्रीकांत शेलगावकर व नूतन विद्यालयाचे शिक्षक माधव ढाकणे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. माधव ढाकणे मनोगत व्यक्त करताना म्हणाले कि, छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक अरबी, उर्दु व फारसी भाषेतील शब्दांना पर्यायी शब्दांसाठी विद्वान पंडितांची नियुक्ति करुन आपल्या भाषेचे संरक्षण व संवर्धन झाले पाहिजे यासाठी त्यांनी प्रयत्न केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रतिकुल परिस्थितीवर मात करुन अदिलशाही, निजामशाई, मोगलशाई या परीकीय सत्तांना नेस्तीनाबूत करुन स्वतःच स्वराज्य महाराष्ट्रात निर्माण केले.

बाल वाचक वल्लभ शेलगावकर व वाचक ओम आहेर,कृष्णा पत्की यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन शाम शेलगावकर यांनी तर आभार शैलेंद्र बदनापुरकर यांनी मानले. पांडुरंग काळे,प्रतिमेश शेलगावकर,रेणुका गुल्लापेल्ली,महेंद्र होलानी,कैलासचंद्र सराफ,मयंग गुल्लापेल्ली,सोपानदेव सरनाईक,धुंडीराम पाजणकर,रामकृष्ण खैरे,प्रशांत गुजर याची उपस्थिती होती.

## ज्ञान संदिप शिक्षण संस्थेच्या ३५ व्या वर्धापनदिनी विश्ववंदनीय भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सहवास लाभलेले मा.अनंतराव दाशरथे यांचा प्रथम जीवन गौरव पुरस्कार ज्ञान संदीप शिक्षण संस्थेतर्फे देऊन सन्मानित करण्यात आले

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

ज्ञान संदिप शिक्षण संस्थेच्या ३५ व्या वर्धापनदिनी विश्ववंदनीय भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सहवास लाभलेले मा.अनंतराव दाशरथे यांचा प्रथम जीवन गौरव पुरस्कार ज्ञान संदीप शिक्षण संस्थेतर्फे देऊन सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री .नामदार श्री.अतुलजी सावे साहेब ,पीएसआय श्री.आत्माराम बोर्डे साहेब दिव्य मराठीचे मुख्य उपसंपादक डॉ. शेखर मगर ,धम्मरत्न मित्रमंडळाचे सचिव .एकनाथ पाखरे माजी पीएसआय राधाकिसन शिंदे ,डी एन वाहुळे ,सुहास दाशरथे, बी.बी.शिन्दे,माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळाचे चेअरमन आदरणीय श्री.अनिल साबळे साहेब भारतीय दलित पँथर चे नेते लक्ष्मण भुतकर ज्ञान संदीप शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश सोनवणे सचिव संगीता खिल्लारे मुख्याध्यापक संदीप सोनवणे मुख्याध्यापक अभिजीत सोनवणे संस्थेचे सदस्य किरणकुमार सोनवणे यांची विशेष उपस्थिती मध्ये हा सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून सर्व महामानवाच्या प्रतिमेला पुष्पहार पुष्प मल्हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले व संस्थेचे प्रेरणास्थान दिवंगत तुकाराम बाबा सोनवणे यांच्या प्रतिमेला सुद्धा मान्यवरांचा हस्ते पुष्प हर अर्पण करण्यात आले व अभिवादन करण्यात आले त्यानंतर दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांनी अतिशय सोमवारतून स्वागत गीत सादर केले यावेळी शाळेमधून दहावी उत्तीर्ण होऊन गेलेले विद्यार्थी जे पोस्टमध्ये डायरेक्ट नोकरीला लागले त्यांचा सन्मान सुद्धा करण्यात आला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक संदीप सोनवणे यांनी केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राध्यापक प्रकाश सोनवणे यांनी केले यावेळी ज्ञान संदेश शिक्षण संस्थेच्या वतीने प्रथम जीवन गौरव पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष डॉक्टर शेखर मगर सर यांनी मानपत्राचे वाचन केले त्यानंतर नामदार अतुल दिसावे व संस्थेचे अध्यक्ष प्रकाश सोनवणे व सर्व मान्यवरांच्या हस्ते आनंदचे दासरा ते काका यांचा सन्मान करण्यात आला त्यांना हिमरू शाल तथा सन्मानपत्र स्मृतीचिन्ह भारतीय संविधान गुलाब पुष्प देवन सन्मानित करण्यात आले यावेळी माननीय नामदार तुझे साळवे साहेब यांनी ज्ञान संदेश शिक्षण संस्थेतील जालनात येणाऱ्या विविध उपक्रमाचे स्तुती केली व गौरव उद्गार काढून शिक्षकांना प्रसाद केले त्याचबरोबर आंबेडकर नगर मिसरवाडी फुलेनगर गौतम नगर व आसपासच्या उपस्थित सर्व नागरिकांना या शाळेमध्ये आपले विद्यार्थी प्रवेशित करावेत असे मंत्री महोदयांनी आव्हान केले त्यानंतर संस्थेचे अध्यक्ष प्रकाश सोनवणे यांनी नामदार. अतुल सावे साहेब यांचा शाल संस्थेचे स्मृतिचिन्ह व भारतीय संविधानाची प्रत देऊन सत्कार केला. व उपस्थित सर्व मान्यवरांचा सत्कार करून वंदन गितानी आणि सर्वधर्मसमभाव संदेश देणाऱ्या गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली .त्यानंतर जवळपास ४८ सांस्कृतिक कार्यक्रम साजरे करण्यात आले. यामध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर, माता रमाई ,क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, रयतेचे राजे छत्रपती शाहू महाराज, अंधश्रद्धा निर्मूलन ,व्यसनमुक्ती, राष्ट्रीय एकात्मता ,शेतकरी नृत्य ,शाळेला जायचं आहे ,लल्लाटी भंडार,लावणी, पोवाडा,असे मनमोहक नृत्य सादर करून विद्यार्थ्यांनी उपस्थिताची मने जिंकली परिसरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थित होते .हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेतील सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले .यामध्ये मुख्याध्यापक अभिजित सोनवणे मुख्याध्यापक संदीप सोनवणे, सुनील चौधरी संजय चौधरी विजय पाटील साहेबराव शिंदे नजमा खान, हर्षल पगारे, अजयकुमार खिल्लारे ,आनंद सातदिवे, नयुम शेख , स्वामी जाधव, किरणकुमार सोनवणे,विजय आघाव गौतम मकासरे, वैशाली बोर्डे, वैशाली बागुल ,निता खंडाळे ,सुनिता शेजुळ, परिश्रम घेतले यावेळी सहभागी विद्यार्थ्यांना मान्यवर परीक्षण श्री.बी.बी .शिंदे सर ,डी. एन.वाहुळे सर व प्रमुख पाहुणे नेते श्री.लक्ष्मण भुतकर यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरण करण्यात आले .शेवटी संस्थेचे अध्यक्ष. प्रकाश सोनवणे यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.










## भारतीय दलीत पँथर च्या वतीने रयतेचा राजा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती दिनी सिडको एन -७ येथे अभिवादन



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

भारतीय दलीत पँथर च्या वतीने रयतेचा राजा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती दिनी सिडको छ -७ येथे अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रा प्रकाश सोनवणे लक्ष्मण भुतकर यांनी शिवाजी महाराजानच्या जीवनावर विचारमंथन केले ते म्हणाले की रयतेच्या राजांनी मोठ्या मोठे गड किल्ले जिंकले परंतु आज त्यांच्या किल्लूयाचे संरक्षण करणारे खरे मावळे आज बाजूला राहत आहेत यांची खंत वाटते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती दिनी सर्वांनी एकत्रित येऊन महाराजांच्या कील्याला कोन्हालाहही सुरुंग लावू देऊ नका व त्यांचे विचार आत्मसात करा असे आवाहन पँथर नेते मा लक्ष्मण भुतकर यानी केले. यावेळी पँथर नेते लक्ष्मण भुतकर प्रकाश सोनवणे दशरथ कांबळे प्रकश पवार संजय सरोदे ॲड. सतीश राऊत धम्मपाल दांडगे समाधान कस्तुरे अहमद पठाण रामदास पगडे दिलीप पवार उत्तम डोंगरे शामलाल भगुरे राजकुमार कांबळे योगेश जुमडे अशुद्दीन पठाण वामन गायकवाड सह मोठ्या संख्येने पँथर कार्यकर्ते उपस्थित होते.

## मुंबईत ५.४४ कोटी रुपये किंमतीचे अंमली पदार्थ जप्त, परदेशी महिलेला अटक

मुंबई: काँगोचा एक नागरिक भारतात अंमली पदार्थांची तस्करी करण्याचा प्रयत्न करणार असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यावर, महसूल गुप्तचर संचालनालयाच्या मुंबई विभागाच्या अधिकाऱ्यांनी किन्शासा येथून मुंबई विमानतळावर आलेल्या या महिलेला अटक केली.

भारतात तस्करी करण्यासाठी अंमली पदार्थ असलेल्या कॅप्सूल्सचे सेवन केल्याचे या महिलेने चौकशीदरम्यान कबूल केले. या महिलेला दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्यात आले असून न्यायालयाच्या आदेशानुसार जवळच्या सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले. या महिलेच्या शरीरातून एकूण ५४४ ग्रॅम कोकेन असलेल्या १० कॅप्सूल्स बाहेर काढण्यात आल्या. काळ्या बाजारात या कोकेनची अंदाजे किंमत सुमारे ५ कोटी ४४ लाख रुपये इतकी आहे. अंमली पदार्थ आणि मनावर परिणाम करणारे पदार्थ (एनडीपीएस) कायदा २०२५ अंतर्गत हे कोकेन जप्त करण्यात आले असून याच कायद्याच्या तरतुदीअंतर्गत या महिलेला अटकही करण्यात आली आहे.

## इमाव, विजाभज, विमाप्र प्रवर्गांसाठी मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजनेचे प्रस्ताव इमाव कल्याण विभागाकडे मागविले

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्गातील इयत्ता ५ वी ते ७ वी तसेच इ. ८ वी ते १० वी प्रवर्गतील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना सामाजिक न्याय विभागाअंतर्गत जिल्हा समाजकल्याण अधिकारी जिल्हा परिषद यांच्या मार्फत राबविण्यात येत होत्या.यासंदर्भात शासनाने जारी केलेल्या शुद्धीपत्रकानुसार सन २०२४-२५ पासून आता या योजना सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांच्या मार्फत राबविण्यात येणार आहे, असे सहाय्यक संचालक,इतर मागास बहुजन कल्याण विभाग अनंत कदम यांनी कळविले आहे. तरी इमाव, विजाभज, विमाप्र प्रवर्गाच्या पात्र विद्यार्थ्यांची माहिती त्यांचे बँक खाते, अर्ज प्रक्रिया ही शिक्षण विभाग माध्यमिक व प्राथमिक यांच्याकडे प्राप्त होणे आवश्यक आहे. प्रत्येक शाळेच्या मुख्याध्यापकांनी ही माहिती तयार करुन गटशिक्षणाधिकारी, मुख्याधिकारी, मनपा शिक्षण विभाग यांच्या मार्फत योजनेचे प्रस्ताव सहाय्यक संचालक, इतर मागास कल्याण छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे पाठवावे,असे आवाहन सहाय्यक संचालक अनंत कदम यांनी केले आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विविध योजनांच्या मोफत कॅम्पचे नागरिकांकडून कौतुक







छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त असंख्य कामगार बांधवांना सरकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यात आला.. रयतेसाठी समर्पित कार्य करण्याची प्रेरणा घेऊन अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आलेला हा सोहळा विलक्षण समाधान देणारा ठरला आहे. आकाश नरवडे व राहुल मोरे यांच्या पुढाकाराने बुद्ध विहार, धम्म चौक, रामनगर – संघर्षनगर, छत्रपती संभाजीनगर येथे विविध योजनांच्या मोफत कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. बांधकाम कामगार कल्याण मंडळाच्या माध्यमातून विविध योजनांचा लाभ मिळवून देण्याचे मौल्यवान कार्य निश्चितच सकारात्मक आहे. याप्रसंगी मा.महापौर श्री.बापू घडामोडे, श्री.दीपक खोतकर, उषाताई कदम, श्री.बाळासाहेब शहाणे, श्री.आकाश नरवडे, मीराताई चव्हाण तसेच इतर पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.



# शिवजयंतीदिनी राजधानीत दुमदुमला जयघोष!





**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

'जय भवानी जय शिवाजी'चा जयघोष . . . शिवप्रेमींची मोठी आणि उत्साही उपस्थिती . . . ढोलताशांचा गगनभेदी गजरः शाहिरी पोवाड्यांसह निनादणाऱ्या तुताऱ्या . . . मस्तकी विलसणारे भगवे फेटे . .. भारतीय सेनेची अनोखी मानवंदना . . . अशा अत्यंत उत्साही वातावरणात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती आज देशाच्या राजधानीत मोठ्या उत्साहात साजरी झाली. दिल्लीतील शिवजयंती राष्ट्रोत्सव समितीतर्फे येथील कस्तुरबा गांधी मार्गस्थित नवीन महाराष्ट्र सदनात आज शिवजयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्यास संभाजीराजे छत्रपती आपल्या परिवारासह उपस्थित होते. खासदार राजाभाऊ वाजे, मेजर जनरल एस. एस. पाटील (विशिष्ट सेवाचक्र) यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्र सदनाच्या मुख्य प्रवेश भागातील मध्यस्थानी छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा स्थापन करण्यात आली होती. येथे आयोजित विशेष कार्यक्रमात शिवजन्मोत्सवानिमित्त संभाजीराजे छत्रपती, संयोगिताराजे आणि परिवारातील सदस्यांच्या उपस्थितीत पाळणा पूजन करण्यात आले. त्यानंतर पालखी पूजनही झाले.

सदनाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याजवळ आयोजित कार्यक्रमात संभाजीराजे छत्रपती यांच्यासह मान्यवरांनी अभिवादन केले. महाराष्ट्र सदनाच्या प्रभारी निवासी आयुक्त निवा जैन, सहायक निवासी आयुक्त डॉ. राजेश अडपावार यांच्यासह माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक हेमराज बागुल, महाराष्ट्र सदनाच्या सहाय्यक निवासी आयुक्त स्मिता शेलार आदींसह महाराष्ट्र सदन आणि महाराष्ट्र परिचय केंद्राच्या अधिकारी-कर्मचारी तसेच दिल्ली राजधानी क्षेत्र, हरियाणा, उत्तर प्रदेशातून या कार्यक्रमासाठी उपस्थित मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. या ठिकाणी भारतीय सेनेतर्फे छत्रपती शिवाजी महाराजांना प्रथमच विशेष मानवंदना देण्यात आली. यानिमित्ताने महाराष्ट्र सदनाचा परिसर फुलांनी सजविण्यात आला होता. दिल्लीतील मराठीजन मोठ्या संख्येने या कार्यक्रमास उपस्थित होते.

**ढोल ताशांचे सादरीकरण**

नाशिकच्या ढोल ताशांच्या पथकानेही या कार्यक्रमात सादरीकरण केले. या गजराने सदनाचे वातावरण दुमदुमले. ढोल पथकातील सहभागी तरुणाईचा उत्साह व सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. मानवंदनाच्या कार्यक्रमानंतर .सदनाच्या सभागृहात 'द फोक' आख्यान खड्या आवाजात सादर करण्यात आले. शिवाजी महाराजांच्या चरित्रावर आधारित आख्यान भिडणारे असे होते.

संसद भवन परिसरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास विविध मान्यवरांसह शिवप्रेमींकडून अभिवादन करण्यात आले. खासदार अरविंद सावंत, राजाभाऊ वाजे, भास्कर भगरे व माजी खासदार हेमंत गोडसे आदींची यावेळी उपस्थिती होती. येथेही ढोलताशा पथकाद्वारे मानवंदना देण्यात आली.

# छत्रपती शिवाजी महाराजांचे आग्रा येथे भव्य स्मारक उभारणार -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**आग्रा (वृत्तसंस्था)**

आग्रा येथे छत्रपती शिवाजी महाराजांना ज्या रामसिंगच्या कोठीत ठेवण्यात आले होते ती सध्याच्या मीनाबाजार भागातील जागा महाराष्ट्र सरकार अधिग्रहित करणार असून तेथे छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारणार येईल, अशी घोषणा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज आग्रा येथे केली. यासंदर्भात आपण उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्याशी चर्चा करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

शिवजयंतीनिमित्ताने आग्रा येथील ऐतिहासिक लाल किल्ला येथे अजिंक्य देवगिरी प्रतिष्ठानतर्फे आयोजित 'शिवजन्मोत्सव भारतवर्ष का ' या कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते. या अनोख्या महोत्सवाच्याआयोजनाचे हे तिसरे वर्ष आहे. यावेळी केंद्रीय मंत्री एस पी बघेल, उत्तर प्रदेशचे उच्च शिक्षण मंत्री योगेंद्र उपाध्याय, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे , सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, , फतेहपूर सिक्रीचे खासदार राजकुमार चहर, आग्र्याच्या महापौर हेमलता कुशवाह, आग्रा जिल्हा पंचायत अध्यक्षा डॉ. मंजू भदौरिया, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, आमदार परिणय फुके यांच्यासह छावा या चित्रपटात छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका साकारणारे अभिनेते विकी कौशल, या चित्रपटाचे निर्माते नितीन विजन, कार्यक्रमाचे आयोजक व प्रतिष्ठानचे अध्यक्ष विनोद पाटील आदी उपस्थित होते.

आग्रा येथे शिवजन्मोत्सव साजरा करण्याचे महत्त्व आणि औचित्य अत्यंत अभिमानास्पद असून हा उपक्रम सर्व शिवप्रेमींना ऊर्जा देणारा असल्याचे गौरवोद्गार काढून मुख्यमंत्री म्हणाले, आग्रा येथे महाराजांनी दाखवलेला स्वाभिमान प्रेरणादायी असून या सुटकेनंतर महाराजांनी पुन्हा नव्याने स्वराज्य उभे केले. परकीयांचे दुराचारी शासन संपुष्टात आणून हिंदवी स्वराज्याच्या निर्मितीची प्रेरणा राजमाता जिजाऊंनी महाराजांना दिली, स्वराज्याची स्थापना करणारे शिवाजी महाराज हे युगपुरुष होते. ते उत्तम प्रशासक, महिलांच्या सन्मानाचे रक्षणकर्ते होते. महाराष्ट्राचे समाजभान महाराजांनी जागे केले. समाजातील विविध छोट्या घटकांना, बारा बलुतेदार जातीसमूहांना एका सूत्रात गुंफून त्यातून इमान जपणारे लढवय्ये मावळे उभे केले. जे देव, देश आणि धर्मासाठी निष्ठेने लढल्याने जगात आदर्शवत असे हिंदवी स्वराज्य उभे राहिले. देशाची सूत्रे हाती घेतल्यावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही रायगडावर येऊन प्रेरणा घेतली. छत्रपती शिवाजी महाराजांनी घालून दिलेल्या आदर्शानुसार आम्ही वाटचाल करत असून बलशाली भारत आणि बलशाली महाराष्ट्र निर्माण करण्याचा आमचा निर्धार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.





छत्रपती संभाजी महाराजांचा योग्य आणि जाज्वल्य इतिहास समोर आणल्याबद्दल छावा चित्रपटाचे निर्माते अभिनंदनास पात्र असल्याची प्रशंसा मुख्यमंत्र्यांनी केली. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावरील कादंबऱ्या वाचून आपण प्रभावित झाल्याचे सांगून केंद्रीय मंत्री बघेल म्हणाले, या उपक्रमामुळे राष्ट्रभावना निर्माण होण्यास मोठी मदत होईल .महाराजांच्या शौर्य आणि धाडसामुळे या पुढील काळात आग्रा हे शिवाजी महाराजांच्या नावानेही ओळखले जाईल . तसेच मुंबई -आग्रा हा महामार्ग या पुढील काळात छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने ओळखला जावा, अशी सूचनाही त्यांनी केली .

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून पाठबळातून हा अनोखा कार्यक्रम साकारण्याचे सांगून मंत्री शेलार म्हणाले, महाराजांच्या जीवनातील एकेका प्रसंगावर महानाट्य तयार होऊ शकते इतके ते प्रेरणादायी आहे.आग्रा येथून महाराजांनी सुटका करून घेतलेला दिवस हा युक्ती दिवस म्हणून साजरा करण्यात येईल असे अशी घोषणा त्यांनी यावेळी केली.

श्री योगेंद्र उपाध्याय यावेळी म्हणाले, आग्रा येथे महाराजांना कैदेत ठेवलेली जागा निश्चित करण्यासाठी अनेक इतिहासकारांशी विचार विमर्श केला.त्यातून रामसिंगची कोठी असलेली जागा निष्पन्न झाली. या जागेवर महाराजांचे भव्य स्मारक व्हावे. आग्रा येथे आयोजित जन्मोत्सवाचा हा उपक्रम अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असल्याचे सांगून अभिनेते विकी कौशल म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज ही व्यक्ती नव्हे तर एक विचारधारा व वैश्विक प्रेरणा आहे. आघाडीवर राहून नेतृत्व करणारे ते अत्यंत द्रष्टे नेते होते. समकालिन राजांपेक्षा महाराज वेगळे होते. ते माझे सुपर हिरो आहेत. छावा चित्रपटाच्या माध्यमातून महाराजांचा विचार जगात पोहोचवण्याचा प्रयत्न असल्याचे श्री. विजन म्हणाले

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रतिष्ठानचे अध्यक्ष विनोद पाटील यांनी केले. आमदार परिणय फुके यांनी आभार मानले. प्रारंभी महाराष्ट्र संस्कृतीचे दर्शन घडवणाऱ विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण करण्यात आले . शिवजन्मोत्सवानिमित्त पाळणा पूजन झाले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आग्रा येथील सुटकेच्या प्रसंगावर आधारित नाट्याचेही सादरीकरण झाले. कोल्हापूर येथील पथकाकडून महाराष्ट्राची ऐतिहासिक परंपरा दर्शवणारी मर्दानी खेळांची प्रात्यक्षिके करण्यात दाखवण्यात आली. कार्यक्रमापूर्वी येथील महिला भगिनींनी औक्षण करत मुख्यमंत्र्यांचे आत्मीयतेने स्वागत केले. या अनोख्या स्नेहपूर्ण स्वागताने मुख्यमंत्री भारावले. तसेच या कार्यक्रमादरम्यान छत्रपती संभाजीनगर येथील खंडणीसाठी अपहरण करण्यात आलेल्या चैतन्य तुपे या मुलाने व त्याच्या आई-वडीलांनी या कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेऊन आपल्या सुटकेसाठी तत्परतेने प्रयत्न केल्याबद्दल आभार मानले.

## ..रक्तदानातून शिवरायांना अनोखी मानवंदना!!



महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त सिडको येथील बळीराम पाटील शाळेजवळ भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या ठिकाणी इतर मागास बहुजन कल्याण, दुग्ध विकास व अपारंपारिक ऊर्जा विभाग मंत्री, महाराष्ट्र राज्य व महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य जिल्हा नियोजन समिती सदस्य मा.नगरसेवक अनिल मकरिये यांनी भेट दिली. अनेक रक्तदात्यांनी रक्तदान करून शिवरायांच्या चरणी सेवा अर्पण केली..

## मिल कॉर्नर येथे आरती व अभिवादन...



**मिल कॉर्नर येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य जिल्हा नियोजन समिती सदस्य मा.नगरसेवक अनिल मकरिये यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांची आरती करून अभिवादन करण्यात आले.**

## महाराष्ट्रामध्ये पहिल्यांदाच बिस्किटांपासून साकारले छत्रपती शिवाजी महाराजांचे रेखाचित्र

रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची देशभरामध्ये नव्हे तर देशाबाहेर देखील जयंती साजरी करण्यात येते त्याचाच भाग म्हणून छत्रपती संभाजी नगर शहरातील शिवछत्रपती महाविद्यालयाच्या परंगणामध्ये आमदार विलास बापू भुमरे प्रतिष्ठान आयोजक जय किशन कांबळे यांच्यावतीने चक्क दहा हजार बिस्किटांपासून छत्रपती शिवाजी महाराज यांचे रेखाचित्र उभारण्यात आले आहे याच रेखाचित्राला पाहण्यासाठी शहरातील शिवभक्तांनी मोठी गर्दी यावेळी केल्याचे पाहायला मिळाले. तसेच या सर्व बिस्किटांचे अनाथ आश्रम घाटी रुग्णालय या ठिकाणी वाटप करण्यात येणार आहे अशी माहिती आयोजक जय किशन कांबळे यांनी दिली

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४ ५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४ ३ १ ० ० ५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४ ३ १ ० ० ३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**